महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे
Rs.2/-
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)
रविवार ❖ १३ जुलै २०२५ ❖ वर्ष - सातवे ❖ अंक ०२२ ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

थोडक्यात महत्वाचे

## जनसुरक्षा विधेयकाला ठाम विरोध

: विनोद निकोले

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कासा : जनसुरक्षा विधेयक हे कामगार, कष्टकरी व आंदोलन करणाऱ्या घटकांचे हक्क हिरावून घेणारे असल्याचा आरोप करीत आमदार विनोद निकोले यांनी विधानसभेत या विधेयकाला विरोध दर्शविला.

'मुख्यमंत्र्यांनी हे विधेयक विधानसभेत मांडले असताना, दोन्ही सभागृहांत सत्ताधारी पक्षाला बहुमत असल्यामुळे ते सहज मंजूर होणार असल्याचे स्पष्ट होते. तरीही या विधेयकातील गंभीर त्रुटी लक्षात आणून देत विरोधकांनी ठामपणे विरोध करणे आवश्यक होते,' असे निकोले यांनी सांगितले. नक्षलवाद संपवणे महत्त्वाचेच आहे; मात्र यासाठी आधीच मकोकासह अनेक कायदे अस्तित्वात आहेत. गडचिरोलीत नक्षलवाद जवळपास संपुष्टात आला आहे, अशा परिस्थितीत नव्या विधेयकाची गरज काय, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ते पुढे म्हणाले, 'कामगारांच्या मागण्यांसाठी आम्ही आवाज उठवत असतो. त्यामुळे आम्हाला संविधानविरोधी ठरविण्याचा प्रयत्न हा चुकीचा आणि लोकशाहीला घातक आहे. महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक हे असंवैधानिक असून, भविष्यात याचा गैरवापर होऊ शकतो. यामुळे कामगारांच्या संघटनांच्या हक्कांवर गदा येईल आणि ही अत्यंत गंभीर बाब आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) हा संविधानाला व कायद्याला मानणारा पक्ष आहे. आम्ही विविध प्रश्नांसाठी आंदोलने करतो, मात्र ती नेहमी कायद्याच्या चौकटीत राहूनच केली जातात. कामगार, शेतकरी, कष्टकरी आणि विविध संघटना ह्या सगळ्या संविधानावर विश्वास ठेवणाऱ्या आहेत. अशा संघटनांवर सरकारने कारवाई करू नये आणि त्यांचे हक्क हिरावून घेऊ नयेत.'

## राजीनामा दिला त्यांना शुभेच्छा आणि नवीन होणार आहेत त्यांनाही शुभेच्छा !



- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांच्या राजीनाम्याच्या चर्चामध्ये जोरदार गोंधळ निर्माण झाला आहे. सोशल मीडियावर आणि माध्यमांमध्ये त्यांचा राजीनामा दिल्याचे वृत्त झळकत असतानाच, पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते जितेंद्र आव्हाड यांनी या वृत्ताला खोडून काढले आहे.

### राजीनाम्यावर काय म्हणाले फडणवीस ?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबत विचारले असता त्यांनी अत्यंत संयमपणे प्रतिक्रिया दिली. "तो त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. ज्यांनी राजीनामा दिला त्यांनाही शुभेच्छा आणि जे नवीन होणार आहेत त्यांनाही शुभेच्छा. सर्वांनी चांगलं काम करावं यासाठी शुभेच्छा," असं त्यांनी एका वाक्यात म्हटलं.

### अजित पवारांनी प्रश्न टाळला

दरम्यान, उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) अध्यक्ष अजित पवार यांनाही माध्यमांनी याच विषयावर विचारले असता, त्यांनी कोणतेही उत्तर न देता प्रश्न टाळत तेथून निघून गेले.

### आव्हाडांनी राजीनाम्याचे वृत्त फेटाळले

राजकीय चर्चांना पूर्णविराम देताना, पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते जितेंद्र आव्हाड यांनी आपल्या 'एक्स' (ट्विटर) वरील पोस्टमध्ये म्हटले आहे की, "जयंत पाटील हेच पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आहेत. त्यांच्या राजीनाम्याच्या बातम्या खोडसाळपणाने पसरवल्या जात आहेत. पक्ष शिस्त आणि नियमानुसार चालतो."

### राजकीय वर्तुळात संभ्रम कायम

जयंत पाटील यांनी अद्याप अधिकृतपणे राजीनामा दिला असल्याची कोणतीही स्पष्ट घोषणा झाली नसल्याने, त्यांचे प्रदेशाध्यक्ष कायम आहे की, त्यांनी खरोखरच राजीनामा दिला आहे, यावर अजूनही संभ्रम कायम आहे. सोशल मीडियावरील चर्चामुळे राजकीय वर्तुळात उत्सुकता वाढली आहे.

## खोपोली- कुसगाव भागात मिसिंग लिंक प्रकल्प !

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज (12 जुलै) मिसिंग लिंक प्रकल्पाची पाहणी केली. मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवरील खोपोली एक्झिट ते कुसगाव या भागात मिसिंग लिंक प्रकल्प उभारण्यात आला आहे. मिसिंग लिंक प्रकल्पामुळे मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर ट्रॅफिक कमी होणार आहे. मिसिंग लिंकमुळे दोन महत्वाचे फायदे होणार आहे. यामध्ये पहिलं म्हणजे 6 किमीचं अंतर कमी होणार आहे. तर दूसरे म्हणजे मुंबई-पुणे प्रवासासाठी अर्धा तास कमी लागणार आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.



### मिसिंग लिंक प्रकल्प ऑक्टोबरपर्यंत 2025 पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश-

मिसिंग लिंक जगातला सगळ्यात रुंद बोगदा आहे. हा मार्ग लोणावळा लेकच्या खाली हजार फूट असणार आहे. जगातला सर्वात ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी वापरुन हा मिसिंग लिंक तयार केला आहे. यामुळे नेहमीच्या वेळापेक्षा मुंबई-पुणे प्रवासासाठी अर्धा तास कमी लागणार आहे. मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे पर्यायी रस्ता (मिसिंग लिंक) लवकरच तयार होणार आहे. हा प्रकल्प 2019 मध्ये सुरू करण्यात आला असून अनेकदा त्याला मुदतवाढ देण्यात आली आहे. आता ऑक्टोबरपर्यंत 2025 पर्यंत मुंबई-पुणे एक्सप्रेस वे मिसिंग लिंक प्रकल्प पूर्ण करण्याचे आदेश दिल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

### कसा आहे मीसिंग लिंक प्रकल्प ?

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील मिसिंग लिंक प्रकल्पामुळे 6 किलोमीटरने अंतर कमी होणार आहे. या मिसिंग प्रकल्पामध्ये खोपोली एक्झिटपासून लोणावळ्यापर्यंत दोन्ही दिशेने 4 मार्गिकांसाठीचे दोन बोगदे उभारण्यात आले आहे. यातील पहिला बोगदा 8.92 किमी, तर दुसरा बोगदा 1.75 किमीचा आहे. तर या बोगद्याला जोडणारा आणि टागर व्हॅलीवर बांधला जाणारा केबल-स्टेड पूल जमिनीपासून सुमारे 132 फूट उंचीवर आहे.

### मिसिंग लिंक कसा जोडला जाईल?

- खोपोली येथून मिसिंग लिंक रस्ता सुरु होईल.
- लोणावळा-खंडाळा विभागात टायगर व्हॅलीपासून 132 मीटर उंचीवर असलेला 640 मीटर लांबीचा केबल-स्टेड पूल
- पहिला बोगदा 8.92 किमी
- दुसरा बोगदा- 1.75 किमी

## मुंबई-गोवा महामार्गावरील प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करावीत -जिल्हाधिकारी किशन जावळे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : मुंबई- गोवा महामार्गावर अपूर्ण असलेल्या कामांमुळे आणि खड्डयांमुळे प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. या महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी टाळून नागरिकांचा प्रवास सुरक्षित होण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने महामार्गावरील बायपास, सर्व्हीस रोड यांचे मजबुतीकरण करुन गणेशोत्सवापूर्वी हा महामार्ग खड्डेमुक्त करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाच्या सद्य:स्थितीबाबत तसेच महामार्गावर होणाऱ्या अपघातांबाबतच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीला जिल्हा पोलीस अधिक्षक आचल दलाल, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते, राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प संचालक यशवंत घोटकर, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) श्रीकांत गायकवाड वाहतूक पोलीस निरीक्षक श्री. सोमनाथ लांडे, तसेच संबंधित यंत्रणेचे क्षेत्रीय अधिकारी, संबंधित ठेकेदार उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी श्री.जावळे म्हणाले की, गणेशोत्सवादरम्यान मुंबई-गोवा महामार्गावरुन लाखो चाकरमनी कोकणात जातात. या काळात त्यांचा प्रवास सुखकर आणि सुरक्षित होणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी पुलांची बांधकामे सुरु आहेत त्याठिकाणी वाहतूक गतिमान होईल यासाठी खड्डे तात्काळ बुजवावे. संपूर्ण महामार्गावर दिशादर्शक बॅनर, बाण ठळक पणे लावावे. आवश्यकतेप्रमाणे ठीक ठिकाणी रिफ्लेक्टर लावावेत, गरज असलेल्या पुलावर सुरक्षेसाठी सुरक्षा जाळ्या लावाव्यात. रायगड जिल्ह्यातील पर्यायी मार्गाचे आवश्यकते प्रमाणे तात्काळ डागडुजी, दुरुस्ती करण्याबाबत यावेळी जिल्हाधिकारी यांनी सांगितले. महामार्गाच्या कामामध्ये प्रास्तावित असलेल्या सर्व सर्विस रोड, भुयारी मार्ग, साईड पट्ट्या यांचे काम प्राध्यान्याने पूर्ण करावे. सर्व संबंधित यंत्रनेने काम पूर्ण झाले की नाही याची खातरजमा करावी. महामार्गाचे काम हा जिल्हाप्रशासनाचा प्राधान्याचा विषय आहे. मुंबई-गोवा महामार्गाचे काम अनेक वर्षापासून सुरु असून अपूर्ण काम व कामाच्या अनियमिततेमुळे महामार्गावर होणाऱ्या अपघातांची संख्या वाढत आहे. तसेच आगामी येणारे सण, उत्सव इत्यार्दीचे अनुषंगाने मुंबई गोवा महामार्गाच्या कामाच्या सद्य:स्थितीबाबत व कार्यवाहीचा आढावा त्यांनी यावेळी घेतला.

तसेच गणेशोत्सवादरम्यान माणगाव, इंदापूर या शहरात होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पोलीस प्रशासनाने आणि महामार्ग प्राधिकरण यांनी ट्राफिक वार्डन नेमण्यात यावेत या ठिकाणची वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी संबंधित यंत्रणानी विशेष काळजी घ्यावी.




## मोरबे धरण प्रकल्पग्रस्तांचे उपोषण मागे

### खालापूर येथे बैठकीत निर्णय

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

खालापूर : मोरबे धरण प्रकल्पग्रस्त कृती समितीचे साखळी उपोषण दोन दिवसानंतर मागे घेण्यात आले आहे. खालापूर येथे शुक्रवारी (ता. ११) पंचायत समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. यावेळी प्रकल्पग्रस्त समिती, उपजिल्हाधिकारी पुर्नवसन विभाग भारत वाघमारे, अरविंद शिंदे शहर अभियंता, प्रांताधिकारी प्रशांत संकपाळ, तहसीलदार अभय चव्हाण, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, गटविकास अधिकारी संदिप कराड, खालापूर पोलिस निरीक्षक सचिन पवार आदी उपस्थित होते.

मोरबे धरण प्रकल्पग्रस्त समितीच्या गेल्या वर्षी ४ जुलै रोजी झालेल्या उग्र आंदोलनानंतर प्रशासनाने



अनेक आश्वासन दिली होती. परंतु, त्यातील एकही आश्वासनाची दखल न घेतल्याने दोन दिवसांपूर्वी साखळी उपोषणाला सुरुवात करण्यात आली. यानंतर प्रशासनाने तातडीने घेऊन बैठकीचे आयोजन केले. प्रकल्पग्रस्तांनी बैठकीत पुर्नवसन कायदा, आंदोलकांवरिल गुन्हे मागे तसेच रोजगाराबाबत केलेल्या मागण्यावर सकारात्मक चर्चा झाल्याने उपोषणाचा निर्णय मागे घेण्यात आला.

कमी भावात जमीन घेतल्या होत्या. आम्ही भूमिहीन झालो. त्याप्रमाणात पुर्नवसन झाले नाही. जनजागर प्रतिष्ठानने उपोषण मागे घेण्यासाठी विनंती केली आहे. माधव भंडारी संस्थापक अध्यक्ष असल्याने आम्ही विश्वास ठेवत उपोषण मागे घेतले आहे, असे मोरबे धरण प्रकल्पग्रस्त समितीतील परशुराम यांनी सांगितले. तर, बैठकीत प्रकल्पग्रस्त यांचे समाधान होईल असे निर्णय झाले. लवकरच त्याबाबत पुढील बैठक घेऊन निर्णय घेण्यात येणार असल्याचे प्रांताधिकारी प्रशांत संकपाळ यांनी सांगितले.






# गीतासार



**अध्याय १६**

**दैवासुरसम्पद्विभागयोगः**

आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः । ईहन्ते कामभोगार्थमन्यायेनार्थसञ्चयान् ॥ १६-१२ ॥

शेकडो आशांच्या पाशांनी बांधले गेलेले ते मनुष्य काम-क्रोधात बुडून जाऊन विषयभोगांसाठी अन्यायाने द्रव्यादी पदार्थांचा संग्रह करण्याचा प्रयत्न करीत असतात. ॥ १६-१२ ॥

इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् । इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ॥ १६-१३ ॥

ते विचार करतात की, मी आज हे मिळविले आणि आता मी हा मनोरथ पूर्ण करीन. माझ्याजवळ हे इतके द्रव्य आहे आणि पुन्हा सुद्धा हे मला मिळेल. ॥ १६-१३ ॥

असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि । ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी ॥ १६-१४ ॥

या शत्रूला मी मारले आणि त्या दुसऱ्या शत्रूंनाही मी मारीन. मी ईश्वर आहे, ऐश्वर्य भोगणारा आहे. मी सर्व सिद्धींनी युक्त आहे आणि बलवान तसाच सुखी आहे. ॥ १६-१४ ॥

# युवापिढी ऑनलाइन जुगारच्या विळख्यात

लेखक: श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५

सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे आणि या तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल ही जीवनावश्यक गरज बनली आहे. आजची तरुण पिढी मोबाईलच्या इतकी आहारी गेली आहे की या तरुणांना मोबाईलचे व्यसनच जडले आहे. आज प्रत्येक तरुणाकडे स्मार्टफोन आहे. या स्मार्टफोनमध्ये इंटरनेटवर चालणारे अनेक प्रकारचे गेम असतात. या गेमने तरुणांना अक्षरशः वेड लावले आहे. कॅण्डी क्रश, ब्ल्यू व्हेल, अँग्री बर्ड, पोकोमेन, पब्जी असे ऑनलाइन गेम इंटरनेटवर धुमाकूळ घालत आहेत. ऑनलाइन रमी गेम हा देखील त्यापैकीच एक गेम. या ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात तरुणाई अडकली आहे. ऑनलाइन रमी गेम खेळण्याचे वेड तरुण पिढीला आर्थिक नुकसान करणारे ठरत आहे. मोबाईलवर खेळला जाणारा हा गेम म्हणजे एकप्रकारचा जुगाराच आहे. हातात असलेल्या मोबाईलवर ऑनलाइन रमी खेळण्याचे अनेक एप्लिकेशन उपलब्ध आहेत. घरी, शेतात, नोकरी, व्यवसायाच्या ठिकाणी अनेकजण एकत्र येऊन ऑनलाइन रमी खेळताना दिसत आहे. ऑनलाइन रमी हा एकप्रकारचा जुगार असून या जुगारात तरुण पिढी पुरती अडकली असून त्यांना त्यातून बाहेर काढण्याऐवजी चित्रपट तारे आणि क्रिकेट खेळणारे खेळाडू या ऑनलाइन रमी गेमची टीव्हीवर जाहिरात करून तरुण पिढीला जुगारच्या गर्तेत ढकलत आहे. चित्रपट तारे असोत की क्रिकेटपटू हे तरुणांचे आयडॉल असतात. त्यांच्या सर्व गोष्टींचे तरुण मुले अनुकरण करत असतात म्हणूनच ऑनलाइन रमी चालवणाऱ्या कंपन्या या सिलिब्रेटींना करोडो रुपये देऊन आपली जाहिरात करायला लावतात मात्र या सिलिब्रेटींनी आपण पैशासाठी तरुण पिढीला कोणत्या मार्गावर नेत आहोत याचा विचार करावा. केवळ पैसे कमावणे हा सिलिब्रेटींचा उद्देश नसावा सामाजिक दायित्व देखील तितकेच महत्वाचे आहे. चित्रपट तारे आणि क्रिकेटर यांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून ऑनलाइन रमीच्या जाहिराती बंद कराव्यात. ऑनलाइन जुगारच्या विळख्यात अडकल्याने तरुणांना मोठ्या आर्थिक नुकसानिस सामोरे जावे लागत आहे. ऑनलाइन रमी गेमच्या नादाला लागून अनेकजण कंगाल झाले आहेत. ऑनलाइन रमी गेममुळे अनेक कुटुंबे उध्वस्त होत आहेत. ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात अडकल्याने अनेक कुटुंबे बेघर झाले आहेत. ऑनलाइन रमी खेळून अनेक तरुण कर्जबाजारी झाली आहेत. ही कर्जे फेडण्यासाठी पालकांनी आपली घरे व शेती विकली आहे. सहज पैसे कमवण्याचे आमिष दाखवून लोकांच्या घामाची कमाई लुटली जात आहे. ऑनलाइन रमी खेळताना पैसे हरल्याने तरुणांमध्ये नैराश्य येत आहे. यातून काही तरुणांनी आत्महत्या देखील केल्या आहेत. या गेममुळे हिंसाचार देखील वाढला आहे. दक्षिणेकडच्या राज्यांनी ऑनलाइन गेमवर बंदी घातली आहे. कर्नाटक सरकारने तसा कायदाच केला आहे. केरळ, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा राज्यातही ऑनलाइन रमीवर बंदी आहे. पुरोगामी महाराष्ट्रात मात्र अजूनही ऑनलाइन रमीवर बंदी नाही. गेल्या वर्षी झालेल्या पावसाळी अधिवेशनात देखील हा प्रश्न चर्चेत आला होता मात्र न्यायालयाने ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिल्याचे सरकारतर्फे सांगण्यात आले. न्यायालयाने जरी ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिला असला तरी महाराष्ट्र सरकारने अध्यादेश काढून तसा कायदा करावा. सरकारकडे प्रचंड बहुमत आहे शिवाय विरोधी पक्ष देखील या अध्यादेशाला पाठिंबाच देतील त्यामुळे अध्यादेश काढून ऑनलाइन रमीवर बंदी घालण्याचा कायदा महाराष्ट्र सरकारला करता येऊ शकतो. राज्यातील तरुणांना ऑनलाइन रमी या जुगारातून वाचवायचे असेल आणि तरुणांना ऑनलाइन जुगाराच्या विळख्यातून सोडवायचे असेल तर महाराष्ट्र सरकारने ऑनलाइन रमीवर बंदी घालणारा कायदा करायलाच हवा.

# कल्याण डोंबिवली मनपा शाळांतील ३८ मुख्याध्यापकांना कारणे दाखवा नोटीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली शिक्षण विभागाच्या मनपाच्या 61 शाळा पैकी सुमारे 38 मुख्याध्यापकांना प्रशासनाने कारणे दाखवा नोटीसा बजावल्या असल्याने केडीएमसीच्या शिक्षण विभागातील शिक्षक, मुख्याध्यापक यांची आता खैर नाही असे चित्र दिसत आहे.कल्याण डोंबिवली मनपा शिक्षण विभागा मार्फत प्राथमिक 59 शाळा माध्यमिक 2 एकूण 61 शाळा असून 1ली ते 10वी इयत्ता मध्ये मुले 4,071 तसेच मुली 4,367अशी एकूण 8438 विघार्थी शिक्षण घेत असून प्राथमिक शिक्षक संख्या 256 , 4 माध्यमिक शिक्षक तसेच बालवाड्या 35 शिक्षक अशी शिक्षक कर्मचारी संख्या आहे. मनपा शाळा मधील शैक्षणिक दर्जा, सोयी सुविधा तसेच पटसंख्या वाढीबाबत उप आयुक्त संजय जाधव यांनी अँक्शन प्लान तयार करून अमंलबजावणी सुरू केली.

कधी नव्हे ते या वर्षी जुलै मध्ये मनपा शाळा मधील विघार्थीना गणवेश, पुस्तके, बुट शालेय साहित्य वाटप करीत बाजी मारली. शाळाचे पालकत्व यासाठी आधिकारी यांच्या कडे दायित्व देत. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आलेख आणि प्रगतीसाठी महिन्यातून परिक्षा घेत प्रगती आढावा सुरू केला. तर केडीएमसी आयुक्त यांनी मनपा शाळेत जाऊन तासभर विद्यार्थ्यांना शालेय धडे देत प्रशासनाने मनपा शाळामधील स्मार्ट होणार या बाबत कंबर कसली आसल्याचे कृतीद्वारे दाखवून दिले. यातून मात्र मनपा शिक्षक वर्गाने बोध घेत नसल्याचे दिसून आल्याने मनपा शाळा मधील 38 मुख्याध्यापकांना उप आयुक्त यांच्या आदेशानुसार कारणे दाखवा नोटीसा बाजविण्यात आल्या.

पाहणी दरम्यान नोटीसा बाजविण्यात आलेल्या मुख्याध्यापकांनी कामात कसूर, कामात चालढकल पणा, बेजबाबदार पणा, पटसंख्या वाढीबाबत प्रयत्न न करणे आढळल्याने कारणे दाखवा नोटीस बाजविण्यात आल्याने शिक्षण विभागातील शिक्षक कर्मचारी वर्गाचे धाबे दणाणले असल्याचे चित्र यानिमित्ताने दिसत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्लेवैभव युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट



## दुर्गराज रायगडावर जल्लोषात अभिवादन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : संपूर्ण देशवासियांचे आराध्यदैवत, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचे शौर्य व पराक्रमाची साक्ष देणारे १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत. 'अद्वितीय वैश्विक मूल्य' या मान्यतेसह या किल्ल्यांचे जागतिक स्तरावर महत्त्व अधोरेखित झाले आहे. यामध्ये महाराष्ट्रातील रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी आणि तामिळनाडूतील जिंजी किल्ला यांचा समावेश आहे.

या ऐतिहासिक क्षणाचे औचित्य साधून रायगड किल्ल्यावर आज जिल्हा प्रशासनाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले. राजसदरपासून लेझीम पथक व पोलीस पथकाने पारंपरिक वाद्यांच्या गजरात होळीचा माळ येथे जाऊन महाराजांना पुष्पहार अर्पण केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळी जाऊन अभिवादन करत पोलीस मानवंदना दिली. तसेच गडावर विविध ठिकाणी आकर्षक रांगोळयांनी सजावट करण्यात आली होती.

यावेळी महाडचे प्रांताधिकारी पोपट ओमासे, उपविभागीय पोलीस अधिकारी (DYSP) महाड, नायब तहसीलदार, तलाठी, मंडळ अधिकारी, महसूल विभागातील अधिकारी-कर्मचारी, शालेय विद्यार्थी आणि शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भिवंडीतील रईस हायस्कूल फुटबॉल स्पर्धेत प्रथम



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी महानगर पालिका आणि ठाणे जिल्हा क्रीडा विभागाच्यावतीने तालुक्यातील ऑल सेंट्स हायस्कूल मैदानावर आंतरशालेय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप स्पर्धा - 2025 आयोजित करण्यात आली होती.त्यामध्ये रईस हायस्कूल या शाळेने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवल्याने खेळाडू विद्यार्थीचे शाळा मुख्याध्यापक व व्यवस्थापनाने अभिनंदन केले आहे.

जिल्हास्तरीय आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत भिवंडी तालुक्यातील 16 हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेजमधील 16 संघांनी सहभाग घेतला होता.सदर स्पर्धेत भिवंडी शहरातील रईस हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेजमधील 17 वर्षे वयोगटातील मुलांच्या संघाने स्पर्धेत भाग घेत उत्कृष्ट क्रीडा कौशल्य दाखवित अंतिम सामना जिंकला, रईस हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज आणि फकीह इंग्लिश मीडियम हायस्कूल यांच्या संघांमध्ये झाला. चुरशीच्या सामन्यात रईस हायस्कूलच्या संघाने फकीह हायस्कूलच्या संघाचा 3 - 1 असा पराभव करीत अंतिम स्पर्धा जिंकली.या खेळाडूंना झाकीर अन्सारी, मुसय्यब मोमीन, इकरा शेख यांनी प्रशिक्षण दिले.रईस ज्युनियर कॉलेजच्या मुलींच्या संघाने 17 वर्षे वयोगटात तिसरे स्थान पटकावले. विद्यार्थ्यांच्या यशस्वी कामगिरीबद्दल हायस्कूल व्यवस्थापनाचे अध्यक्ष अल्माझ फकीह, दानियल काझी, फहद बुबेरे,अब्दुल अझीज अन्सारी दानिश मदु,यासर तातली, प्राचार्य झियाउर रहमान अन्सारी, असरार पठाण अदि मान्यवरांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून सप्टेंबर महिन्यात पहिले विमान घेणार 'टेक ऑफ'

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर जगातील सर्वात जलद "बॅग क्लेम सिस्टीम" विकसित करण्यात यावी, हे या विमानतळावरील प्रमुख वैशिष्ट्य असावे, अशी सूचना आज मुख्यमंत्र्यांनी संबंधितांना येथे दिली. सद्य:स्थितीत या विमानतळाचे 94 टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित सहा टक्के काम सप्टेंबर 2025 पर्यंत पूर्ण करून पहिले प्रवासी विमान उडणार, याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रगतीपथावरील कामाची पाहणी करण्यासाठी आज या ठिकाणी आले असता ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वनमंत्री गणेश नाईक, माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी, मंदा म्हात्रे, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी किसन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक शंतनु गोयल, राजा दयानिधी,



**जगातील सर्वात जलद 'बॅग क्लेम' प्रणाली होणार कार्यान्वित - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

गणेश देशमुख, मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, गीता पिलाई , नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सह पोलीस आयुक्त संजय सिंह येनपुरे, उपायुक्त रश्मी नांदेडकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह इतर सर्व मान्यवरांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रगतीपथावर असलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. ही पाहणी करताना त्यांनी विशेषतः विमान प्रवाशांना देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांचा आढावा घेतला.

येथील कामांची पाहणी झाल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रसारमाध्यम प्रतिनिधींना प्रकल्पाच्या सद्य:स्थितीविषयी माहिती दिली की, दि.10 जून 2022 रोजी सिडकोतर्फे 1हजार 160 हेक्टरच्या संपूर्ण जागेवर 100% प्रवेश आणि मार्गाधिकारासाठी अनुज्ञप्ती एनएमआयएएलला प्रदान करण्यात आली आहे. सर्व पुनर्वसन पूर्ण झाले आहेत आणि सिडकोने भूसंपादन आणि पुनर्वसन यासाठी अंदाजे 2000 कोटी खर्च केले आहेत.

नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड (NMIAL) या कंपनीने दि.29 मार्च 2022 रोजी प्रकल्पासाठी वित्तीय ताळेबंदी (Financial Closure) साध्य केली, ज्यामध्ये SBI ने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टप्पा-1 आणि टप्पा 2 साठी 19 हजार 647 कोटी रु. एकूण प्रकल्प खर्चापैकी 12 हजार 770 कोटी रु. मंजूर केले आहेत (NMIAL द्वारे रु. 15 हजार 981 कोटी आणि सिडकोद्वारे रु. 3 हजार 665 कोटी)

सिडकोतर्फे 1 हजार 160 हेक्टर क्षेत्रामध्ये 5.5 मीटरपर्यंत भूविकास, उलवे नदीचा प्रवाह वळविणे आणि उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्यांचे स्थानांतरण, ही विकासपूर्व कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

दि.11 ऑक्टोबर 2024 रोजी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर भारतीय हवाई दलाच्या वाहतूक विमान C-295 द्वारे उद्घाटन लँडिंग करण्यात आले आणि त्यानंतर SU 30 ने दोन लो पास केलेत. तसेच इंडिगो एअरलाइन्सच्या एअरबस A320 ने 29 डिसेंबर 2024 रोजी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहिले व्यावसायिक लँडिंग यशस्वीरित्या पूर्ण केले.

दि.30 जून 2025 पर्यंत या प्रकल्पाने एकूण 96.5% भौतिक प्रगती साधलेली आहे. सध्या जवळपास 13 हजार कर्मचारी या ठिकाणी कार्यरत आहेत तर उर्वरित काम पूर्ण होण्यासाठी अधिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी. आणि कोणत्याही परिस्थितीत सप्टेंबर पूर्वी हे काम पूर्ण करावे, अशा सूचना सर्व यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या 1आणि 2 टप्प्यामध्ये 20 दशलक्ष प्रवासी आणि 0.8 दशलक्ष मेट्रिक टन मालवाहतूक करण्याची क्षमता आहे, हे विमानतळ सप्टेंबर 2025 मध्ये कार्यान्वित होण्यासाठी सज्ज होत आहे.

या विमानतळाचे भूमीपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते आणि त्याचे उद्घाटनही आता त्यांच्याच हस्ते होणार आहे, याचा विशेष आनंद असल्याचेही ते शेवटी म्हणाले.

# रेसिपी

## आरोग्यदायी कणीस



कणीस हे केवळ चविष्ट नाही तर आरोग्यासाठी फायदेशीर आहे. कॉर्न मध्ये भरपूर जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटीऑक्सिडंट्स असतात जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात आणि बद्धकोष्ठतेपासून आराम देतात. कणीस खाल्ल्याने हे फायदे मिळतात

**कोलेस्टेरॉलची पातळी कमी होते**

कॉर्न खाल्ल्याने बॅड कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होते. कॉर्नमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे ते शरीरातील बॅड कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यास मदत करते. तसेच कॉर्नमध्ये असलेले जीवनसत्त्वे नवीन पेशी तयार करतात. याशिवाय, ते मधुमेहावरही नियंत्रण ठेवते.

**त्वरित ऊर्जा देते**

या ऋतूत बहुतेक लोकांना सुस्ती जाणवते. अशा परिस्थितीत कॉर्न एनर्जी बूस्टर म्हणून काम करते. त्यात असलेले नैसर्गिक साखर आणि कार्बोहायड्रेट्स तुम्हाला त्वरित ऊर्जा देतात.

**वजन कमी करण्यासाठी प्रभावी**

जर तुम्हाला वजन लवकर कमी करायचे असेल तर तुम्ही कॉर्न खावे. खरं तर, त्यात असलेले फायबर पोट बराच काळ भरलेले ठेवते. यामुळे तुम्ही जास्त खाणे टाळता. ते कॅलरीज देखील जलद बर्न करते, ज्यामुळे वजन कमी करणे सोपे होते.

**रोगप्रतिकारशक्ती वाढते**

या काळात अनेक प्रकारच्या हंगामी आजारांचा धोका वाढतो. यासाठी मजबूत रोगप्रतिकारक शक्ती असणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत, जर तुम्ही मका खाल्ला तर ते शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवेलच , पण आजारांचा धोकाही कमी होतो. मक्यामध्ये असलेले व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात.

# डोंबिवलीत भाषेचा विषय पुन्हा एकदा चर्चेत

## मराठमोळ्या डोंबिवलीत गोव्याच्या राज्यपालांनी केलं मल्याळम भाषेत भाषण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डोंबिवलीत भाषेचा विषय पुन्हा एकादा चर्चेत आला असून मराठमोळ्या डोंबिवलीत गोव्याच्या राज्यपालांनी मल्याळम भाषेत भाषण केलं. या भाषणाचा व्हिडियो व्हायरल झाला आहे.

केरळ समाजम् मॉडेल कॉलेजच्या इमारतीच्या तिसऱ्या टप्प्याच्या उद्घाटन आणि उत्सव समारंभास गोव्याचे राज्यपाल डॉ. पी.एस. श्रीधरन पिल्लई आले होते. याबाबत मनसे नेते, माजी आमदार राजू पाटील यांनी केलेली एक्स पोस्ट व्हायरल होत असून, मराठी भाषेचा द्वेष करणाऱ्यांचे राजू पाटील यांनी कान टोचले आहेत.

प्रत्येकाने आपापली भाषा व संस्कृती जपावी पण सोबतच ज्या राज्यात आपण राहतो त्या राज्यातील राजभाषेचा मान ही ठेवावा हीच अपेक्षा असते. यात कोणत्या भाषेचा व लोकांचा द्वेष करण्याचा प्रश्न येतोच कुठे ? असा सवाल मनसेचे माजी आमदार राजू पाटील यांनी उपस्थित केला आहे.

# रिक्षा चालकाने स्वत: बुजविले रस्त्यातील खड्डे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कल्याण डोंबिवली महानगर पालिका प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर अवलंबून न राहता एक रिक्षा चालकाने स्वतः परिश्रम करून रस्त्यावर पडलेले खड्डे बुजविण्याचे काम केले. या कामामुळे त्याने पालिकेचे व नागरिकांचे लक्ष वेधून घेतले आहे. आता तरी पालिका प्रशासन रस्त्यातील खड्डे बुजविणार का अशी विचारणा नागरिक करीत आहेत.



पालिकेच्या ह प्रभागक्षेत्र अंतर्गत असलेल्या पश्चिम विभागातील अनेक रस्ते खड्डेमय झाल्याने त्रस्त झालेल्या एका रिक्षाचालकाने स्वतः खड्डे बुजविले. रिक्षा चालविताना खड्ड्यामुळे मणक्याचा त्रास, पाठदुखी, कंबरदुखी होत असल्याने अखेर मीच खड्डे बुजविल्याचे त्या संतोष मिरकुटे यांनी सांगितले.

काही दिवसांपूर्वी डोंबिवलीतील पालिकेच्या 'ह' प्रभाग क्षेत्र कार्यालयासमोर रिक्षाचालकांनी ठिय्या आंदोलन केले होते. सहायक आयुक्त राजेश सावंत यांच्या आश्वासनानंतर रिक्षाचालकांनी आंदोलन मागे घेतले. डोंबिवली पश्चिमेकडील अनेक रस्ते खड्डेमय झाल्याने नागरिकांनी प्रशासनावर नाराजी व्यक्त केली आहे.


जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण

मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त

प्रवेश सुरू (२०२५•२६)

पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी

एम.ए (एमसीजे) (मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)

-पात्रता- कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण

- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी - टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .

- प्रवेशासाठी संपर्क - ९४२१०५९३९६

goveli_jssp@rediffmail.com

www.jeevandeepcollegegoveli.in


# आजचे राशि भविष्य



**मेष**

तुम्ही जे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करत आहात ते आज साध्य होऊ शकते. आज तुम्हाला तुमचे लक्ष्य साध्य करण्यासाठी अधिक मेहनत करावी लागेल.

**वृषभ**

काम कितीही कठीण असले तरी एकाग्रता टिकवून ठेवावी लागेल.तुम्हाला ऑफिसमध्ये नवीन प्रोजेक्ट मिळेल, तुमच्या सहकाऱ्यांची मदत मिळेल.

**मिथुन**

मुलांकडून आनंद मिळेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाईल. तुमचे व्यावसायिक संपर्क मजबूत करण्याचा प्रयत्न कराल.

**कर्क**

महत्त्वाच्या व्यक्तीशी किंवा राजकारणी व्यक्तीशी भेटणे फायदेशीर ठरेल. व्यवसायात आज तुम्हाला फायदा होईल.नफा मिळविण्यासाठी तरी मदत घ्यावी लागेल.

**सिंह**

वादविवादांपासून दूर राहावे लागेल जेणेकरून तुम्ही तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करू शकाल. समस्या सुटल्यानंतर तुम्हाला मानसिक शांती मिळेल.

**कन्या**

कामाच्या ठिकाणी तुमचे काम चांगले होईल. तुम्हाला काही कामात मदत लागेल, या बाबतीत तुम्हाला एखाद्या चांगल्या मित्राचा सल्ला मिळेल.

**तूळ**

महत्त्वाची कामे सकारात्मक दृष्टिकोनाने पूर्ण करता येतील.व्यावसायिक बाबतीत आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतील.

**वृश्चिक**

विरोधक तुमचे नुकसान करण्याचा अयशस्वी प्रयत्न करतील. या राशीचे लोक जे सरकारी सेवेत आहेत त्यांना काही उत्कृष्ट असाइनमेंट मिळू शकते.

**धनु**

तुमचे कोणतेही नियोजित काम पूर्ण होईल.तुम्ही काही काम करण्याच्या नवीन पद्धतीचा विचार कराल, यामुळे काम वेळेवर आणि पूर्ण होण्यास मदत होईल.

**मकर**

विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाणार आहे. तुमच्या कामाला नवीन स्वरूप देण्यासाठी तुम्हाला काही सर्जनशील क्रियाकलापांमध्ये देखील रस असेल.

**कुंभ**

विद्यार्थ्यांना स्पर्धेशी संबंधित कार्यात यश मिळू शकते. नवीन कामाचा विचार करण्याची पूर्ण संधी मिळू शकते.विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे.

**मीन**

अभ्यासात अजून मेहनत करावी लागेल. आज तुम्हाला तुमच्या कुटुंबातील सदस्यांसोबत चांगला वेळ घालवायला मिळेल, ज्यामुळे कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील.


जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित

जीवनदीप महाविद्यालय, गोवेली

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली

मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त

११ वी व १२ वी कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)

UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.

POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography

Admission Open 2025-2026

आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज

आजच आपला प्रवेश निश्चित करा!

7775851123, 8108559566 9619188558

# गुरूंचा आशीर्वाद मिळवण्यासाठी धर्माच्या बाजूने उभे रहा

## - सुनील कदम, हिंदू जनजागृती समिती



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : धर्म, राष्ट्र आणि न्याय यांच्या रक्षणासाठी प्रत्येकाने स्वतःला झोकून देणे, हेच खरे गुरुपूजन ठरेल. प्राचीन काळापासून प्रत्येक वेळी धर्माच्या बाजूने उभे असणाऱ्यांपेक्षा अधर्मी आणि अन्याय करणाऱ्यांची संख्या आणि शस्त्रबळ अधिक होते; पण अंतिम विजय हा धर्माचाच झाला आहे.; कारण भगवंत आणि गुरुतत्त्वाचा आशीर्वाद धर्माच्या रक्षणासाठी कार्यरत असणाऱ्यांवरच असतो. आजही गुरुतत्त्व सनातन धर्माच्या रक्षणासाठी आणि भारताच्या उत्कर्षासाठी कार्यरत आहे. त्यामुळे प्रत्येकाने राष्ट्र आणि धर्माच्या कार्यासाठी झोकून देणे आवश्यक आहे. गुरूंचा आशीर्वाद मिळवण्यासाठी धर्माच्या बाजूने उभे रहा, असे आवाहन हिंदू जनजागृती समितीचे सुनील कदम यांनी केले. ते 'राष्ट्र आणि धर्म यांच्या रक्षणासाठी साधना आणि युद्धकाळातील कर्तव्ये' या विषयावर १० जुलै रोजी पनवेल येथील श्री बँक्वेट्स येथे संपन्न झालेल्या गुरुपौर्णिमा महोत्सवाच्या प्रसंगी मार्गदर्शन करताना बोलत होते. यंदा गुरुपौर्णिमा महोत्सव देशभरात ७७ ठिकाणी आणि रायगड जिल्ह्यात पनवेल आणि उरण येथे भावपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

महोत्सवाचा प्रारंभ श्री व्यासपूजन आणि प.पू.भक्तराज महाराज यांच्या प्रतिमापूजनाने झाला. सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या संदेशाचे वाचन केले गेले. 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाच्या प्रेरणादायी व्हिडिओचे प्रक्षेपण करण्यात आले. रामराज्य स्थापनेसाठी संकल्प व सामूहिक नामजप करण्यात आला. धर्म, अध्यात्म, साधना, बालसंस्कार, आचारधर्म, आयुर्वेद, प्रथमोपचार, स्वसंरक्षण, हिंदु राष्ट्र आदी विषयांवरील ग्रंथप्रदर्शन आणि फलक प्रदर्शन लावण्यात आले होते.

पनवेल येथील महोत्सवात भाजपचे प्रदेश संयोजक धनराज विसपुते म्हणाले, 'विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी केवळ भौतिक ज्ञान न देता नीती, संस्कार, साधना, नामजप आणि मूल्य आधारित आध्यात्मिक ज्ञान हे मिळणे आताच्या काळात अत्यंत आवश्यक आहे. या आचरणानेच केवळ आपले नव्हेच तर राष्ट्र आणि धर्माचे रक्षण होणार असून हे करणे आपलेच दायित्व आहे.'तर उरण येथील महोत्सवात अधिवक्ता सौ. वृषाली पाटील म्हणाल्या, 'भारत देशात बहुसंख्य हिंदू असून सुद्धा भारत हिंदुराष्ट्र का नाही ? याचा विचार करून प्रत्येकाने धर्माचरण करणे आवश्यक आहे. हिंदूंनी आता स्वतःच्या रक्षणासाठी उभे राहिले पाहिजे. धर्माचरण, साधना, नैतिकता आणि स्वधर्म जपण्यावर भर देत समाजातील प्रत्येक व्यक्तीने राष्ट्रासाठी आध्यात्मिक आणि व्यावहारिक जबाबदारी स्वीकारावी.' यावेळी सनातन संस्थेच्या सौ. प्रवीण पाटील यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले.ऑनलाईन गुरुपौर्णिमा महोत्सव: देश-विदेशांतील हजारो भाविकांसाठी मराठी, हिंदी, गुजराती, तमिळ आणि मल्याळम् भाषांमध्ये ऑनलाईन गुरुपौर्णिमा महोत्सवांचे आयोजन करण्यात आले. अनेक भाविकांनी याचा लाभ घेतला.

# वडवली येथे स्वाध्याय परिवाराच्या वतीने वृक्षारोपण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सालाबादप्रमाणे यंदाही स्वाध्याय परिवार वडवली -अटाळी परिसरा तर्फे १२ जुलै हा दिवस 'वृक्ष मंदिर' आणि 'माधव वृंद' दिवस म्हणून साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने गावदेवी मंदिर वडवली येथे पिंपळाचे झाड लावण्यात आले. या उपक्रमाद्वारे, पर्यावरणाचे जतन आणि संवर्धन करण्याचा



संदेश देण्यात आला. यावेळी युवासेना कल्याण उपशहर प्रमुख वैभव पाटील यांनी देखील उपक्रमात सहभाग घेत वृक्षारोपण केले. निरोगी आरोग्य पाहिजे असल्यास प्रत्येकाने दरवर्षी एक तरी झाड लावण्याचे आवाहन यावेळी त्यांनी उपस्थितांना केले. यावेळी स्वाध्याय परिवाराचे सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक-२०२४' विधानपरिषदेत मंजूर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : देशाच्या संविधानाला आव्हान देणाऱ्या, माओवादी प्रवृत्तीच्या संघटनांवर प्रतिबंध घालण्यासाठी विधानपरिषदेत 'महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक, २०२४' मांडण्यात आले. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी हे विधेयक सभागृहात मांडत त्यामागील कारणे आणि गरज स्पष्ट केली. विधेयकावर सखोल चर्चा झाल्यानंतर सभापती प्रा. राम शिंदे यांनी ते बहुमताने मंजूर झाल्याचे जाहीर केले.

गृहराज्यमंत्री कदम यांनी सांगितले की, हे विधेयक लोकशाहीला आव्हान देणाऱ्या आणि शहरी नक्षलवादाला प्रोत्साहन देणाऱ्या संघटनांवर कारवाई करण्यासाठी आहे. राज्यात सध्या अशा प्रकारच्या एकूण ६४ संघटना सक्रिय असून, त्यांचा बंदोबस्त करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी युएपीए (UAPA) कायद्याच्या मर्यादा अधोरेखित करत सांगितले की, UAPA फक्त हिंसक घटना घडल्यास लागू होतो, मात्र सध्या नक्षलवादी विचारसरणी हिंसाचाराशिवायच शहरांमध्ये शिरकावत आहे. त्यामुळे त्यांच्या पद्धतीला थोपवण्यासाठी स्वतंत्र कायदा आवश्यक ठरतो. फक्त विचारांच्या आधारे दोष सिद्ध करणे UAPA अंतर्गत शक्य नसते.

विधेयकानुसार, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती, जिल्हा न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश आणि सरकारी वकील यांचा समावेश असलेले सल्लागार मंडळ स्थापन करण्यात येणार आहे. या मंडळासमोर सर्व पुरावे सादर करण्यात येतील आणि त्यांची शिफारस मिळाल्यानंतरच संबंधित संघटनेवर बंदी घालण्यात येईल. याशिवाय, बंदी घालण्यात आलेल्या संघटनेचा सदस्य असलेल्या व्यक्तींवरही कायदेशीर कारवाई होणार आहे.गृहराज्यमंत्री कदम यांनी हा कायदा सामान्य आंदोलकांवर किंवा सरकारविरोधी मतप्रदर्शन करणाऱ्यांवर नाही, तर केवळ माओवादी विचारसरणीच्या फैलावावर नियंत्रण आणण्यासाठी असल्याचे यावेळी स्पष्ट केले.

### छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक वारसाचा दर्जा मिळाल्याबद्दल

# आ.रविंद्र चव्हाण यांच्या जनसंपर्क कार्यालयासमोर जल्लोष



## भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास केले अभिवादन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक वारसाचा दर्जा मिळाला आहे. ही महाराष्ट्रासह संपूर्ण भारतासाठी अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची घटना आहे. शनिवारी १२ तारखेला डोंबिवली पश्चिमेकडील सम्राट चौक येथील भाजपा प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण यांच्या जनसंपर्क कार्यालयासमोर भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करत पुष्पहार अर्पण केले.

भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जल्लोष करत कार्यकर्त्यांनी 'छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी, जय शिवाजी' घोषणा दिल्या. यावेळी डोंबिवली पश्चिम मंडळ अध्यक्ष पवन पाटील, अध्यक्षा प्रिया जोशी, सचिव डॉ. सर्वेश सावंत, हरीश जावकर, मयुरेश शिर्के यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी हरीश जावकर म्हणाले, आजचा दिवस प्रत्येक मराठी माणसाच्या अभिमानाचा आहे. मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया या नावाने महाराष्ट्रातील ११ ऐतिहासिक किल्ले आणि तामिळनाडूतील जिंजी किल्ला यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाला आहे. हे केवळ जागतिक गौरवच नाही, तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचा, शौर्याचा आणि स्वराज्य स्थापनेचा जागतिक सन्मान आहे. तर कृष्णा पाटील म्हणाले, रायगड, राजगड, शिवनेरी, प्रतापगड, पन्हाळा, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, साल्हेर, खांदेरी आणि जिंजी या गडांमध्ये आजही त्या तेजस्वी इतिहासाची शौर्यगाथा झळकते. हे किल्ले म्हणजे फक्त दगडमातीचे बुरुज नाहीत, ते आपली ओळख, अस्मिता आणि अभिमान आहेत. या ऐतिहासिक कार्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो. त्यांच्या नेतृत्वाखाली, आपला इतिहास जागतिक स्तरावर पोहोचत आहे. मयुरेश शिर्के म्हणाले, या किल्यांची जपणुकीची आणि संवर्धनाची जबाबदारी आपणही स्वीकारूया.

# कोळसेवाडी पोलिसांच्या वतीने गणेशोत्सव मंडळांचा गौरव

## शिवगर्जना मित्र मंडळ प्रथम तर न्यु संघर्ष मित्र मंडळ द्वितीय

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सार्वजनिक गणेश उत्सव 2024 मध्ये कोळशेवाडी पोलीस स्टेशन हद्दीत स्थापन झालेल्या 40 सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांपैकी सर्वोत्कृष्ट सामाजिक उपक्रम राबविणारे मंडळ, देखाव्यातुन जनजागृती करणारे मंडळ तसेच शिस्तबद्ध मंडळ यांना सालाबाद प्रमाणे गणराया पारितोषिक प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक असे प्रमाणपत्र देवुन त्यांचा शुक्रवारी गौरव करण्यात आला.

यामध्ये प्रथम क्रमांक शिवगर्जना मित्र मंडळ गवळीनगर, व्दितीय क्रमांक न्यु संघर्ष मित्र मंडळ, चिंचपाडा रोड, तृतीय क्रमांक अष्टविनायक सेवा मंडळ महावीर नगर, या मंडळांची निरीक्षण समिति सदस्य उमाकांत चौधरी, प्रवीण खाडे, शिवशंकर साव यांच्या



निवड समितीने निवड केल्याने प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक असे प्रमाणपत्र देवुन त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच निरीक्षण कमिटी सदस्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

गणेशोत्सव मंडळांना आगामी गणेश उत्सव सणामध्ये डी. जे. चा वापर करू नये. पारंपारिक वादयाचा वापर करावा. मंडळांनी समाजपयोगी कार्यक्रम राबवावेत तसेच आपण इतर मंडळांना आपल्याप्रमाणेच समाजपयोगी कार्यक्रम राबविण्या बाबत संदेश देण्यात यावा याप्रमाणे सुचना दिल्या. या प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमास 15 ते 20 मंडळांचे पदाधिकारी, शांतता समिती सदस्य, पोलीस मित्र असे मिळून 22 ते 25 सदस्य उपस्थित होते. उपस्थित मंडळांच्या सदस्यांनी पोलीस दलातर्फे प्रमाणपत्र मिळाल्याने आभार व्यक्त केले असल्याची माहिती कोळसेवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश न्हायदे यांनी दिली.

# मुंबई मनपा बँकेची निवडणुक गणेशोत्सवानंतर घ्या

## संचालक भानुदास भोईर यांची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : महाराष्ट्रात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात घरोघरी तसेच सार्वजनिकरित्या साजरा होत असतो.मुंबई महानगर पालिकेची नोकरी करणारे कोकणस्थ तसेच महाराष्ट्रातील अन्य जिल्ह्यांतील हजारो पालिका कर्मचारी दरवर्षी सुट्ट्या घेऊन गणेशोत्सव साजरा करण्यासाठी कुटुंबासह आपल्या गावी जात असतात.त्यामुळे सदर कर्मचारी मतदानापासुन वंचित राहू नयेत यासाठी बृहन्मुंबई महानगर पालिका कर्मचाऱ्यांची बँक असणाऱ्या दि म्युनिसिपल को-ऑप. बँकेच्या संचालक मंडळ सन 2025-2030 ची निवडणूक गणेशोत्सवानंतर घ्यावी अशी मागणी दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँकेचे विद्यमान संचालक भानुदास भोईर यांनी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांना लेखी निवेदन देऊन केली आहे.

बृहन्मुंबई महानगर पालिका कर्मचाऱ्यांची बँक असणाऱ्या दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाच्या सन 2025-2030 या कालखंडासाठीच्या पंचवार्षिक निवडणूक कार्यक्रमात जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, मुंबई (1) शहरे यांच्यामार्फत दि. 7 जुलै 2025 रोजी 60 हजार 138 पात्र सभासद मतदारांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या तारखेपासूनच्या अंदाजित निवडणूक वेळापत्रकानुसार मतदान हे सार्वजनिक गणेशोत्सवाच्या दोन किंवा तीन दिवस अगोदर म्हणजेच 25 ऑगस्ट 2025 रोजी होण्याची शक्यता असून या गणेशोत्सवाच्या काळात मतदान कार्यक्रम घेतल्यास मतदार गावी गेल्याने उमेदवारांच्या निवडणूक प्रचारकार्यात अडसर निर्माण होईल व मोठ्या प्रमाणात मतदारसुद्धा मतदानापासून वंचित राहण्याची शक्यता आहे.यामुळे निवडणुकीची टक्केवारीही घटण्याची शक्यता आहे.तरी सदर अडचणीचा विचार करून मतदानाचा कालखंड गणेशोत्सवाच्या किमान 5 दिवस अगोदरपासून ते अनंत चतुर्दशीपर्यंत वगळून निवडणूक प्रक्रिया राबवावी अशी मागणी संचालक भानुदास भोईर यांनी केली आहे.

### भिवंडी मनपा आयुक्तांनी

# नारळी तलाव व शांतीनगर मधील शाळांना दिल्या भेटी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : दि.०९/०७/२०२५ रोजी मा.प्रशासक तथा आयुक्त श्री अनमोल सागर, मा.उपायुक्त श्री बाळकृष्ण क्षिरसागर सो व प्रशासनाधिकारी श्री सौदागर शिखरे यांनी भिवंडी नि. शहर महानगरपालिकेच्या शांतीनगर, नारळी तलाव मधील शाळांना भेट दिली त्या ठिकाणच्या सदर शाळेची इमारतीबाबत शौचालय, विद्युत पुरवठा, स्वच्छता या बाबत माहीती घेण्यात आली व संबंधीत विभागांना या वावत सुधारणा करण्यासाठी सुचना देण्यात आल्या. शाळेच्या इमारतीत असलेल्या सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांची संयुक्त समिती करावी व त्यामार्फत शाळेच्या सुरक्षेबाबत, स्वच्छतेबाबत व इतर भौतिक सोईसुविधांबददल पाठपुरावा करण्याच्या सुचना देण्यात आल्या. त्याचप्रमाणे विद्यार्थी पटसंख्या, शिक्षक




उपस्थिती तसेच शालेय अभिलेखांची तपासणी केली व त्या संदर्भात सर्व उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन केले तसेच डिजिटल क्लासरूम चा नियमित वापर करण्याकरीता वर्ग निहाय व विषय निहाय वेळापत्रक तयार करण्याबाबत सर्व शिक्षकांना निर्देश दिले. शालेय इमारती, वर्ग खोल्या, शाळेचा परिसर व शौचालय यांची दररोज नियमितपणे स्वच्छता करणेबाबत संबंधित प्रभाग अधिकारी यांना सुचना दिल्या.

# लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड आणि यूएसए बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स नवनाथ रणखांबे सन्मानित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : साहित्यिक नवनाथ रणखांबे यांचे शारदा प्रकाशनाने प्रकाशित केलेले "प्रेम उठाव" या पुस्तकांचा सन्मान लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड आणि यूएसए बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स मध्ये झाला आहे. या पुस्तकांची प्रसार माध्यमातून जोरदार चर्चा झाली आहे. मराठी साहित्य क्षेत्रात 'प्रेम उठाव' या काव्यसंग्रह पुस्तकावर परिक्षणे, आभिप्राय, समीक्षा कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त समीक्षक,



साहित्यातील जाणकार, सुज्ञ वाचक वर्गांनी केली असून ती दर्जेदार दैनिके, साप्ताहिके, मासिके इ. मध्ये प्रकाशित झाली आहे. प्रेम उठाव या पुस्तकावरील 171 परिक्षणांची ऐतिहासिक विश्वविक्रमाची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड आणि यूएसए बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स मध्ये झाली आहे. मराठी साहित्य क्षेत्रात एक अनोखे ऐतिहासिक विश्व रेकॉर्ड निर्माण झाले आहे. त्यामुळे नवनाथ रणखांबे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. नवनाथ रणखांबे हे विविध बुक ऑफ रेकॉर्ड धारक असून राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पुरस्काराने ते सन्मानित आहेत.

### 'एक पेड माँ के नाम' अंतर्गत

# विभूती विद्यालयाने राबवली वृक्षारोपण मोहिम



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : इको क्लब फॉर मिशन लाईफ अंतर्गत जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून दि. 5 जून ते 30 सप्टेंबर 2025 या कालावधीत ' एक पेड माँ के नाम ' या शीर्षांतर्गत शाळांमध्ये वृक्षारोपण मोहिम राबविणेसाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांचे निर्देशाचे पालन करत श्री विभूती प्रकाशानंदजी विद्यालय, इंदिरानगर, वागळे इस्टेट, ठाणेचे मुख्याध्यापक कुँवर राकेश गंभीर सिंह तोमर यांचे मार्गदर्शनाखाली अवघड बाबा शिवमंदिर, वागळे इस्टेट, ठाणे येथील मंदिर परिसरात दि.12 जुलै 2025 रोजी वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये मानवी जीवनाशी व जंगलातील प्राण्यांना आवश्यक असणाऱ्या विविध प्रजातीच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमासाठी वरिष्ठ शिक्षक संतोष कुमार सिंह, सत्यप्रकाश सिंह, सफातुल्लाह खान, अर्जुन चेमटे, विनोद राठोड, संतोष कुमार आर सिंह, धनंजय देसले, सुनील प्रजापती, संजय मार्कंडेय सिंह सह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# राज्यातील जिल्हा परिषद सेवानिवृत्त शिक्षक संघटनेची २८ जुलैला बैठक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : महाराष्ट्र राज्यातील जिल्हा परिषद नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रातील सेवानिवृत्त झालेल्या प्राथमिक शिक्षकांच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी सोमवार २८ जुलैला पुणे येथील शिक्षक भवनात बैठक बोलावली असल्याचे पत्रक महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक संघटनेचे अध्यक्ष शिवानंद भरले यांनी प्रसिध्दीस दिली आहे.

राज्यातील जिल्हा परिषद नगरपालिका महानगरपालिका क्षेत्रातील २०२४ व २५ वर्षात सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांच्या ग्रॅज्यूटी, पेन्शन विक्रीसाठी रक्कम मिळावेत सेवानिवृत्तानां निवडश्रेणीचा व १०-२०-३० अश्वासीत प्रगती योजनेचा लाभ घ्यावा, निवृत्तीनंतर घरवापसी प्रवास भत्ता मिळावेत, पेन्शन विक्री समायोजन केद्र सरकार प्रमाणे ११ वर्षांनी समायोजन करावेत जिल्हा परिषद सेवानिवृत्त शिक्षकाचें पेन्शन दरमहा कोषागार कार्यालयामार्फत व्हावेत या मागणीसाठी चर्चा होणार आहे बैठकी नंतर शिक्षण संचालक मा शरद गोसावी यांना प्राथमिक शिक्षण संचालक पदाचा कायम चार्ज मिळाले बद्दल संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात येणार आहे सदरच्या बैठकीला सेवानिवृत्त शिक्षक उपस्थित राहावेत असे अध्यक्ष शिवानंद भरलेआवाहन सरचिटणीस रामराव वराड यांनी आवाहन केले आहेत

# समाजसेवक सुजित नलावडे यांचा वाढदिवस बाल संगोपन केंद्रात साजरा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : सामाजिक बांधिलकी जपत समाजसेवक सुजित नलावडे यांनी छोट्यांच्या सानिध्यात आपला वाढदिवस साजरा केला. बाल संगोपन केंद्रातील मुलांनी प्रेमाने नलावडे यांचे औक्षण करीत हॅपी बर्थ डे म्हणत टाळ्या वाजवून आनंद व्यक्त केला.

डोंबिवली शहरातील प्रतिष्ठित व्यावसायिक म्हणून ओळख असणारे सुजित नलावडे हे आपला वाढदिवस दरवर्षी साध्या पद्धतीने साजरा करतात. यावर्षी नलावडे यांनी वाढदिवसानिमित्ताने पश्चिमकडील बालसंगोपन केंद्रात भेट दिली. येथील केंद्रात मुलांसाठी काही साहित्य वाटप करून मुलांच्या सानिध्यात काही वेळ खर्ची केला. तसेच त्यांनी वृद्धाश्रमातील ज्येष्ठांचे आशीर्वाद घेऊन त्यांनाही मदतीचा हात दिला. नलावडे यांच्या वाढदिवसा निमित्ताने विविध क्षेत्रातील लोकांनी भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

# वन जमीन जागा निश्चितीसाठी कार्यक्रम राबविणार – वनमंत्री गणेश नाईक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


मुंबई : वन जमिन जागा निश्चित करण्यासाठी वन विभाग आणि महसूल विभागामार्फत संयुक्त कार्यक्रम राबविण्यात येईल, असे वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासांत सांगितले. विधानसभा सदस्य नाना पटोले यांनी यासंदर्भात विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता.

वनमंत्री श्री. नाईक यांनी सांगितले, ज्या जमिनीची नोंद महसूल विभागाकडील ७/१२ उताऱ्यावर नाही, पण त्याची नोंद वन विभागाच्या अभिलेख्यात दाखवली आहे, याची माहिती तलाठी स्तरापर्यंत संकलित केली जाईल आणि त्यानुसार वन जमीन जागा निश्चित केल्या जातील.

राज्यात वाघ व बिबट्यांची संख्या वाढली आहे. वन्यजीवांच्या हालचालीस अडथळा येऊ नये यासाठी समृद्धी महामार्गावर ज्याप्रमाणे व्यवस्था करण्यात आल्या आहेत त्याप्रमाणे इतर ठिकाणीही व्यवस्था करण्यात येईल.महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, झुडपी जंगल, वन जमीन, या जमिनीवरील अतिक्रमण संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला आहे. त्यानुसार केंद्र शासनास विहित नमुन्यात माहिती दिली जाईल. तसेच मुख्यमंत्री, वनमंत्री आणि महसूल मंत्री यांच्या संयुक्त बैठकीत या संदर्भातील नियमावली करून याबाबतचा शासन निर्णय जारी केला जाईल.

## दहागांव येथे रोख रक्कम व दागिन्यांची चोरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



शहापूर ग्रामीण : वासिंद पासून अवघ्या 2की. मी. अंतरावर असलेल्या दहागांव येथे चोरट्यांनी दरवाजाची कडी तोडून रोख रक्कम व दागिन्यांची चोरी करून पोबारा केला. दहागांव मध्ये राहणाऱ्या विलास धानके यांच्या घरात कोणी नसताना चोरट्यांनी बंद दरवाज्याची कडी तोडून कपाटात असलेले रोख रक्कम व दागिन्यांची चोरी केल्याची घटना घडली आहे.

गुरुवार दि.10 जुलै रोजी सायंकाळी पाच-सव्वा पाचच्या सुमारास सदरची घटना घडली आहे. येथील दहागांव (दुसरा पाडा) येथे राहणारे विलास धानके यांच्या पत्नी या चारच्या सुमारास वासिंद बाजारात गेल्यावर त्यानंतर विलास धानके हेही पावणे पाचच्या सुमारास टेम्पो भाड्यावर निघून गेले यावेळी घरात कोणी नव्हते यामुळे अज्ञात व्यक्तींनी घराचा मागील दरवाज्याची कडी तोडून घरातील कपाटात असलेले दिड लाखांची रक्कम तसेच कानातील व एक अंगठी या सोन्याच्या वस्तूंची चोरी केली. विलास धानके यांच्या पत्नी घरी आल्यावर ही चोरी झाल्याचे समजले तर सदरची घटना पाच - सव्वापाचच्या सुमारास घडली आहे.

दरम्यान, या घडलेल्या घटनेमुळे गावात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. तर याबाबत घरमालक विलास धानके यांनी वासिंद पोलिस ठाण्यात तक्रार दिली असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## कल्याण गायन समाजाचे शताब्दी वर्षात पदार्पण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




कल्याण : शतकी वाटचाल करणाऱ्या मोजक्याच संस्थांच्या पंक्तीत बसण्याचा मान कल्याण येथील "कल्याण गायन समाजाने" नुकताच प्राप्त केला. गुरुवार दि १० जुलै २०२५ रोजी कल्याण गायन समाजाने ९९ वर्ष पूर्ण करून शताब्दी वर्षात पदार्पण केले. त्यानिमित्ताने कल्याण पश्चिम येथील लक्ष्मीनारायण मंदिरात संस्थेच्या वतीने वेदमूर्ती दिलीप गोडसे आणि कमल बोडस यांच्या मार्गदर्शनाखाली "ईशस्तुति" या महिला मंडळानी लघुरुद्र पठण केले.

कल्याण गायन समाजाच्या व शताब्दी वर्षाच्या समितीमधील सर्व कार्यकर्ते या धार्मिक कार्यक्रमास सहकुटुंब उपस्थित होते. संस्थेचे ट्रस्टी नंदकिशोर मुजुमदार आणि मुजुमदार यांनी यजमानपद भूषविले. लक्ष्मीनारायण मंदिर कार्यकरणीने सर्व व्यवस्था अत्यंत उत्तम रीतीने केली होती.

सायंकाळी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त अभिनव गोयल यांच्याहस्ते दिपप्रज्वलन करून शताब्दी वर्षाचा श्रीगणेशा करण्यात आला. वटवृक्ष हे दीर्घायुष्य आणि समृद्धीचे प्रतीक. संस्थेला असेच दीर्घायुष्य लाभो या भावनेतून राम जोशी यांच्या संकल्पनेनुसार, ९९ विद्युत दिव्यांनी आधीच प्रकाशमान असलेल्या एका वटवृक्षाच्या प्रतिकृतीसमोर १०० वा दिवा आयुक्तांनी प्रज्वलित केला आणि शताब्दी वर्षाचे उद्घाटन झाल्याचे जाहीर केले. आयुक्तांनी समाजाचे शताब्दी वर्षानिमित्ताने कौतुक केले व समारंभास आमंत्रित केल्याबद्दल संस्थेचे आभार मानले.

त्यानंतर कै. भास्करबुवा बखले यांच्या स्वरचित तसेच त्यांनी लोकप्रिय केलेल्या बंदिशींवर आधारित एक विशेष कार्यक्रम संस्थेच्या शिक्षकांनी सादर केला. ललितागौरी रागातील बंदिशीने सुरू झालेला हा कार्यक्रम, मारवा, बिहाग, श्री, हमीर अशा विविध रागातील बंदिशी आणि नाट्यगीतांनी नटला होता. कौस्तुभ आपटे, मनिषा घारपुरे, मृदुला साठे, मेघना भावे, स्वाती मुजुमदार यांच्या गायनाला ईशान भट, स्नेहल धामापूरकर, स्वप्नील भाटे यांनी तबल्यावर तर अनिरुद्ध गोसावी, दीपक घारपुरे, हर्षल काटदरे यांनी हार्मोनियम व ऑर्गनवर साथ दिली.

कार्यक्रमाला पूरक अशा निवेदनाची बाजू अतुल वझे यांनी सांभाळली. उपस्थित सर्व रसिकांनी कार्यक्रमाचे तोंडभरून कौतुक केले. येत्या संपूर्ण वर्षभर असेच अनेक उत्तमोत्तम कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे पदाधिकारी प्रशांत दांडेकर यांनी सांगितले. कार्यक्रमास अध्यक्ष डॉ संदीप जाधव, डॉ नंजप्पा, माधव जोशी हे मान्यवरही उपस्थित होते.




## एसटीने घडविले भाविकांना 'विठ्ठल दर्शन'

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने आषाढी एकादशी यात्रेनिमित्त ५२०० जादा बसेसच्या माध्यमातुन एस.टी. ने तब्बल ९ लाख ७१ हजार ६८३ भाविक प्रवाशांची सुरक्षित ने-आण करुन त्यांना विठ्ठल दर्शन घडविलेले आहे. या सेवेतुन एस.टी.ला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजार रुपये उत्पन्न मिळालेले आहे अशी माहिती परिवहन मंत्री तथा एस.टी. महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिलेली आहे.

मा. मंत्री सरनाईक म्हणाले की, आषाढी यात्रेनिमित्त अवध्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या विठुरायाच्या दर्शनासाठी संपुर्ण महाराष्ट्रातुन श्री. क्षेत्र पंढरपुर येथे मोठ्या संख्येने भाविक प्रवाशी येत असतात. या भाविक प्रवाशांना त्यांच्या गावापासून पंढरपुर पर्यंत ने-आण करण्यासाठी एस.टी. ने तब्बत ५ हजार २०० जादा बसेस सोडल्या होत्या. ०३ ते १० जुलै दरम्यान या बसेसनी २१ हजार ४९९ फेऱ्या करुन तब्बत ९ लाख ७१ हजार ६८३ भाविक प्रवाशांची सुरक्षित ने-आण करण्यात आलेली आहे. यातुन एस.टी. महामंडळाला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजार इतके उत्पन्न मिळालेले आहे. जे मागील वर्षी मिळालेल्या उत्पन्नापेक्षा ६ कोटी ९६ लाख ३ हजार रुपयाने जास्त आहे. [सन-२०२४ साली आषाढी यात्रेचे एकुण उत्पन्न २८ कोटी ९१ लाख ५८ हजार रुपये इतके होते] अर्थात एवढे चांगले उत्पन्न आणुन लाखो भाविकांना सुखरुप देवदर्शन घडवून आणणारे हजारो चालक/वाहक, यांत्रिक कर्मचारी व त्यांना मार्गदर्शन करणारे पर्यवेक्षक व अधिकारी अभिनंदन पात्र आहे. असे प्रतिपादन परिवहन मंत्री सरनाईक यांनी केले.

हजारो एस.टी. कर्मचाऱ्यांना मोफत भोजन व्यवस्था आषाढी यात्रेच्या कालावधीमध्ये पंढरपुरमध्ये येणाऱ्या एस.टी. कर्मचारी व अधिकाऱ्यांची जेवणा अभावी गैरसोय होऊ नये म्हणून परिवहन मंत्री तथा एस.टी. महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी स्वखर्चातून दि.०५ ते ०७ जुलै रोजी मोफत, चहा नाश्ताची सोय केली होती. याचा फायदा हजारो एस.टी. कर्मचाऱ्यांनी घेतला. याबद्दल सर्व एस.टी. कर्मचाऱ्यांनी परिवहन मंत्री सरनाईक यांचे आभार मानले आहे. आषाढी यात्रेकरीता ०५ ते ,०८ जुलै या कालावधीत रा.प. रायगड विभागाने प्रवाशांच्या सोयीकरीता सुमारे ७० बसेस पंढरपुर यात्रेकरीता संचलित केलेल्या आहेत. सदर बस सेवेचा लाभ घेऊन सुमारे १३ हजार प्रवाशांनी विठ्ठल दर्शनाचा लाभ घेतलेला आहे. तसेच बसेसद्वारे रायगड विभागाने ७१९६५.० कि.मी. संचलित करुन ३७६५६३७ इतके उत्पन्न मिळविलेले आहे. गतवर्षीच्या तुलनेत रायगड विभागाने २२९६४.० कि.मी. जादा संचलित करुन गतवर्षीपेक्षा १७२६८३२ रुपये उत्पन जादा मिळविलेले आहे. अशी माहिती विभाग नियंत्रक, रा.प. रायगड विभाग, पेण यांनी दिली.

## अभिनयाबरोबरच शिक्षणातही कौशल्याचा ठसा

### अर्जुनीला 'आर्यभट्ट नॅशनल गणित स्पर्धेत' उल्लेखनीय यश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : अभिनय क्षेत्रात आपल्या नैसर्गिक अभिनयामुळे सर्वांची लाडकी ठरलेली बालकलाकार कु. अर्जुनी हिने आता शैक्षणिक क्षेत्रातही आपली चमक दाखवत विशेष कौतुकास पात्र ठरले आहे.

अखिल भारतीय तांत्रिक कौशल्य विकास परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या "आर्यभट्ट नॅशनल गणित स्पर्धेच्या" पहिल्या फेरीत अर्जुनी हिने ७६.६७ टक्के गुण प्राप्त करत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

शालेय अभ्यासाबरोबरच अभिनय, नृत्य अशा विविध क्षेत्रात सक्रीय सहभाग असलेल्या अर्जुनीचे हे यश प्रेरणादायी आहे. तिच्या या यशामुळे तिने केवळ आपल्या शाळेचा नव्हे तर संपूर्ण परिवाराचा आणि चाहत्यांचा अभिमान वाढविला आहे.

या यशाबद्दल तिच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## कल्याण तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच खाजगी दवाखाने रुग्णांनी तुडूंब

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




कल्याण : सध्या नदी, नाले,विहिरी, धरणे तलाव मुसळधार पावसामुळे ओंसडून वाहत आहेत, पुराच्या दूषित व गढूळ पाण्यामुळे पाणी स्त्रोत दूषित होत आहेत,याचा परिणाम म्हणून मलेरिया, टायफॉइड,उलटी, जुलाब, सर्दी, ताप, खोकला, या सारख्या आजारानी ग्रामीण रुग्णालयाये,प्राथमिक आरोग्य केंद्र, तसेच खाजगी दवाखाने पेंशटनी तुडूंब भरुन गेलेले असताना महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या 'उपविभागीय पाणी तपासणी प्रयोगशाळेच्या अहवालात मात्र कल्याण तालुक्यात सह शहापूर तालुक्यात एकही दूषित पाणी स्त्रोत नसल्याचे दिसून येत असल्याने याचे मोठे आश्चर्य व्यक्त होत आहे.

आरोग्य विभागाच्या म्हणण्यानुसार जवळपास ९९ टक्के आजार हे पाण्यामुळे होतात, पावसाळ्यात तर याचे प्रमाण भयानक वाढते, पाणी पुरवठा योजना, विहिरी, बोअरवेल, यामध्ये पावसाचे गढूळ व दूषित पाणी जाते, अनेक योजनांच्या पाईपलाईन या नाल्यातून, गटारातून जात असल्याने त्यामध्ये देखील दूषित पाणी जाऊन साथीचे आजार पसरतात. एकट्या कल्याण तालुक्याचा विचार केला तर ५२ स्वतंत्र पाणी योजना, तसेच रायते पाणी योजना यापैकी एकाही योजनेवर पाणी शुध्दीकरण यंत्रणा नाही,त्यामुळे टिसीएल व मेडिक्लोअर च भरवसा ठेवावा लागतो आहे, पाणी योजनांचे स्त्रोत हे नदीच्या जवळपास असल्यामुळे पुराच्या वेळी त्यामध्ये गढूळ पाणी मिसळते, तालुक्यातील अनेक गावात विहिरी, बोअरवेल, चे पाणी पिण्यायोग्य नाही, या सर्वाचा परिणाम म्हणून मलेरिया, टायफॉईड, कावीळ, अतिसार, जिआर्डियासिस, क्रिप्टोस्पोरिडिओसिस, असे आजार उद्भवतात.

गोवेली ग्रामीण रुग्णालयात दररोज ३०० ते ३५० ओपीडी, दहागाव प्राथमिक आरोग्य केंद्र ५०/६० खडवली १०० ते १५० पेंशट उपचारासाठी येत आहेत, यातील दररोज ७/८ जुलाब उलटी तर १०/१२ मलेरिया, टायफॉईड चे निष्पन्न होत आहेत, असे वैद्यकीय अधिका-याचे म्हणणं आहे. असे असेल तर यामागील कारण काय?

परंतु जैविक पाणी नमुने अहवाल पाहिला तर त्यामध्ये तालुका वाईज अंबरनाथ पाणीस्त्रोत २२६,तपासले पाणी नमुने ७० यापैकी दूषित आढळलेले ६, भिंवडी ८६० स्त्रोतापैकी ४०५ तपासले, दूषित ७, कल्याण १८४ पैकीं तपासले १८६ ,दूषित एक ही नाही, मुरबाड ७६० तपासले ५७२, दूषित ४,आणि शहापूर ११०९ स्त्रोतापैकी तपासले ६४२, दूषित, एकपण नाही? म्हणजे एकूण ३३ प्राथमिक आरोग्य केंद्रातर्गत ३ हजार १३९ स्त्रोतापैकी १ हजार ८७५ पाणी नमुने तपासले यापैकी केवळ १७ दूषित आढळून आले, यावर विश्वास कसा ठेवायचा? यावर शासनाच्या तपासणी प्रयोगशाळेचे जिल्ह्यातील वरीष्ठ भूवैज्ञानिक नितीन दहेकर यांना विचारले असता ते म्हणाले, ही ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे, ते जसे पाणी नमुने देतील तसे ते तपासणी करून देणं हे आमच काम आहे. तर याबाबत धर्मवीर चॅरिटेबल ट्रस्ट चे कल्याण तालुका अध्यक्ष किरन केणे यांना विचारले असता ते म्हणाले, हे सर्व कागदी घोडे नाचविण्याचे काम करतात, एकमेकांवर केवळ जबाबदारी ढकलून मोकळे होतात, मात्र याचा त्रास नागरिकांना भोगावा लागतो.

## भिवंडीमध्ये विद्यार्थिनींना लैंगिकता आरोग्य विषयक माहिती उपक्रम संपन्न

### ७०० विद्यार्थिनींसह महिलांचा सहभाग

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



भिवंडी : नवयुवती मध्ये आरोग्य विषयक व मासिक पाळी संदर्भात जनजागृती होण्याचा दृष्टिकोनातून भिवंडी शहरातील पद्मानगर येथील स्वामी विवेकानंद हिंदी हायस्कूलमध्ये सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ.सुप्रिया अरवारी यांनी विद्यार्थिनींना आणि त्यांच्या मातांना किशोरवयीन आरोग्य उपक्रमांबद्दल माहिती देऊन सर्वांनी आरोग्य संदर्भात नेहमी जागरूक राहून काळजी घेतली पाहिजे असे आवाहन केले.

जनजागृतीसाठी करण्यात आलेल्या या उपक्रमात शाळेतील या उपक्रमात साठी सुमारे ७०० महिला आणि विद्यार्थिनींनी भाग घेतला.त्यामध्ये इयत्ता ६ वी ते ९ वी पर्यंतचे ४०० विद्यार्थीनी आणि सुमारे ३०० माता आणि शाळेतील कर्मचारी होते.यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.सुप्रिया अरवारी म्हणाल्या की,युवा किशोरवयीन काळात मुलींच्या आरोग्याशी संबंधित नेहमी तक्रारी होत असतात जसे की यौवनावस्थेतील शरीररचना आणि शरीरक्रिया विज्ञान, मासिक पाळीचे आरोग्य आणि स्वच्छता, लैंगिक शोषण, पदार्थांचे सेवन,चांगला-वाईट स्पर्श इत्यादीं प्रश्न निर्माण होत असतात यावेळी घाबरून न जाता आपल्या पालकांना मुलींनी माहिती देणे आवश्यक त्यानंतर लैंगिक विषयावर डॉक्टरांशी संपर्क साधून सविस्तर चर्चा करून सदर प्रश्न सोडविणे आवश्यक असल्याचे मत.डॉ. सुप्रिया यांनी व्यक्त केले.

यावेळी निरोगी आहार, व्यायाम आणि वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. उपस्थित विद्यार्थ्यांनी आणि इतरांनी या आरोग्य सत्राचा खूप आनंद घेतला अनेकांनी प्रश्न आणि टिप्पण्या देऊन डॉक्टरांशी संवाद केला. भिवंडी शहरात मोठ्या संख्येने कामगार वस्ती असून देशातील विविध भागातून कामगारांचे कुटुंब येथे आपली उपजीविका करण्यासाठी शहरात स्थायिक झालेले आहेत. त्यांच्यासाठी आरोग्याविषयी माहिती देणारे सत्र आयोजित करणे अपेक्षित असताना शाळेने उपक्रम राबविल्याने उपस्थित पालकांनी कार्यक्रमाचे कौतुक केले. या प्रसंगी डॉ.सुप्रिया अरावरी यांनी डॉ.सत्यम आणि सुवर्णा पेम्बटला व विवेकानंद हायस्कूल व्यवस्थापन व मुख्याध्यापक यांनी कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल विशेष आभार मानले.

## ज्येष्ठ संपादक राजूभाई शहा यांचे निधन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : पत्रकार मित्र व रायगड ध्वनी समाचारचे संपादक, जेष्ठ पत्रकार श्री.राजू नरोत्तमदास शाह यांची अचानक तब्येत बिघडल्याने त्यांना पनवेल येथील एम.जी.एम. रुग्णालयात चार दिवसांपूर्वी दाखल करण्यात आले होते.मात्र त्यांचे आज पहाटे २वा४५मिनिटांनी रुग्णालयातच दुःखद निधन झाले आहे. श्री.राजू शाह यांचे पार्थिव चिंचपाडा,पेण येथे राहत्या घरी आणून त्यांच्यावर वैकुंठधाम पेण येथील स्मशानभूमीत सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी सामाजिक राजकीय पत्रकारिता व विविध क्षेत्रातील नातेवाईक व आप्तेष्ट मित्रपरिवार सगेसोयरे यांनी पार्थिवाचे दर्शन घेतले .मृत्यू समयी त्यांचे वय ६७ वर्ष होते.. त्यांच्या पश्चात एक मुलगा एक मुलगी व पत्नी असा परिवार आहे. यावेळी गुजराथी समाजाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

## जेष्ठ नागरिक सेवाभावी संस्था घणसोली तर्फे आषाढी एकादशी निमित्त 'हरिनाम दिंडी चा' कार्यक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



नवी मुंबई : घणसोली येथील जेष्ठ नागरिक सेवाभावी संस्था व ओम साई मॉर्निंग ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशी निमित्त रविवार दिनांक ६/७/२०२५ रोजी सकाळी ७ वाजता "हरिनाम दिंडी "चे आयोजन करण्यात आले होते .संस्थेचे अध्यक्ष श्री भास्कर आव्हाड यांच्या आवाहनानुसार घणसोली सेक्टर 11 मधील साईबाबा मंदिर ,साईबाबा चौक ते सेक्टर ९ मधील घरोंदा स्थित आदर्श सोसायटी मधील श्री विठ्ठल रखुमाई मंदिर पर्यंत हरिनाम दिंडीचे आयोजित केली होती

या हरिनाम दिंडीत ओम साई मॉर्निंग ग्रुप चे सदस्य व जेष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेचे नागरिक मोठ्या संख्येने उत्साहाने सहभागी झाले होते."या हरिनाम दिंडीत "सर्वांनी विशिष्ट पांढरा पोशाख व पांढरी टोपी परिधान करून व कपाळी टिळा लावून अगदी शिस्तपद्ध पद्धतीने हरिनाम दिंडीचे संचलन केले .दिंडी "विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठला " या हरिनामाच्या गजराने सर्वत्र दुमदुमली होती .श्री भास्कर आव्हाड ,श्री प्रमोद गायकवाड ,श्री दत्तात्रय कुंजीर ,श्रीरंग निकम ,शंकर घाडगे व श्री घुले इत्यादींनी सातत्याने विठ्ठल नामाचा जयघोष करीत पहाटेचे वातावरण हरिनाम स्मरण व ते ही टाळ गजराच्या साथीने अत्यंत भक्तिमय व सर्वत्र आनंददायी केले होते तसेच यात सर्व सदस्य व बाल गोपाळ मंडळी अगदी अंतर्मना पासून हरिनामाच्या नामस्मरणात तल्लीन होऊन आनंदाने नाचत होते . "हरिनाम दिंडी "विठ्ठल रखुमाई मंदिर पर्यंत आल्यानंतर विठ्ठल मंदिर परिसरात आदर्श सोसायटी चे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य यांनी दिंडीचे व सहभागी माऊली भक्तांचे उत्साहाने स्वागत करून त्यात सहभाग घेऊन आनंद मय सोहळा द्विगुणित केला .हरिनाम दिंडीत जवळपास 100 माऊली भक्तांनी सहभाग घेऊन हरिनामाच्या गजराने वातावरण अधिक प्रसन्नमय केले होते .आदर्श सोसायटी च्या सर्व पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य यांनी आषाढी एकादशी निमित्त विठ्ठल रखुमाई मंदिरात पूजाअर्चा ,महाआरती व आकर्षक सजावट करून हा सोहळा उत्साहात संपन्न केला .

हरिनाम दिंडी चे आयोजन यशस्वीरित्या पार पडावे यासाठी जेष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य यांनी नियोजनबद्ध आखणी केली होती .




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024